आधुनिक तंत्रज्ञानाबरोबर

# प्रगती आणि स्थैर्य यांचा उत्तम समतोल

साधणारी संस्था




३६ वा


## वार्षिक अहवाल

सन २०२४-२५

बचत, गुंतवणूक,
समृध्दी यांचे
अविरत विकासचक्र

श्री पार्श्वनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., कराड
संचय - स्वावलंबन - समृध्दी

Next Gen.
Core Banking




# श्री पार्श्वनाथ

## नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कराड

चावडी चौक, गुरुवार पेठ, कराड ४१५ ११० ☎ : (०२१६४) २२०५८९, २२१०५३.
E-mail : parshwanath_karad@rediffmail.com | Web : www.parshwanathpatsanstha.com

# संचालक मंडळ
## सन २०२४-२०२५

आमचे प्रेरणास्थान



माजी अध्यक्ष
स्व. शांतीलाल शाह



चेअरमन
श्री. सुहास शाह



व्हा. चेअरमन
श्री. राजेश मेहता



श्री. राजीव शाह



श्री. अतुल दोशी



श्री. कांतीलाल ओसवाल



श्री. सुहास शाह (नेर्लेकर)



श्री. गिरीश शाह



श्री. सुनिल शाह



डॉ. श्री. प्रशांत शाह




श्री. चेतन शाह



सौ. सुचिता शाह




सौ. आरती शाह



श्री. हरिभाऊ करडे




श्री. राकेश शाह



श्री. भुषण शाह



श्री. श्रीकांत केळकर
मुख्य व्यवस्थापक




रजि. नं. SAT / KRD / RSR / CR / 765 Dt. 28-8-1989

# श्री पार्श्वनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कराड

मुख्य कार्यालय : ७५,७६,७७,७७/१, गुरुवार पेठ, चावडी चौक, कराड : फोन नं. २२०५८९

## छत्तीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

स.न.वि.वि.

**श्री पार्श्वनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कराड** या संस्थेची छत्तीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार, दि. १३ सप्टेंबर २०२५** रोजी दुपारी ठीक ३.०० वाजता **यशवंतराव चव्हाण स्मृति सदन (टाऊन हॉल), कराड** येथे आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

### सभेपुढील विषय

१) वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस वाचणे.

२) मागील दि. १२ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत वाचून कायम करणे.

३) अ) सन २०२४ – २०२५ चे अहवाल, ताळेबंद व नफा–तोटा पत्रक संचालक मंडळाने सभेपुढे मान्यतेकरिता सादर केले आहे, त्यास मान्यता देणे.
ब) सन २०२४ –२०२५ चे अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे व सन २०२५–२०२६ चे अंदाजपत्रकास मान्यता देणे.

४) सन २०२४ –२०२५ च्या मा.संचालक मंडळाने मान्य करुन सादर केलेल्या नफा विभागणीस मान्यता देणे व लाभांशाचे प्रमाण जाहीर करणे.

५) सन २०२४–२०२५ चा अंतर्गत व सरकारी लेखापरीक्षकांचा अहवाल वाचून त्यास मान्यता देणे.

६) सन २०२५–२०२६ करिता अंतर्गत लेखापरिक्षक यांचे नियुक्तीस कार्योत्तर मान्यता देणे.

७) सन २०२५–२०२६ करिता सरकारी लेखापरिक्षक यांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

८) वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेनुसार थकीत व बुडीत कर्ज, कर्ज वसुलीचे अधिकार कायम ठेऊन निर्लेखित करणेस मान्यता देणे बाबत.

९) मा. सहकार आयुक्त, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दि. २९ जुलै २०२५ रोजी प्रसिद्ध केलेले परिपत्रकानुसार आदर्श उपविधी स्वीकृत करणेबाबत.

१०) छत्तीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे बाबत.

११) आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर मा. अध्यक्षांच्या परवानगीने विचार विनिमय करणे.
आभार व समारोप

स्थळ : कराड
दिनांक : २९ ऑगस्ट २०२५

मा.संचालक मंडळाचे आदेशावरून
**श्री. श्रीकांत बाळकृष्ण केळकर**
मुख्य व्यवस्थापक

### ✻ सभासदांकरीता सुचना ✻

१) सन २०२४–२०२५ चा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा–तोटा पत्रक हे संस्थेच्या मुख्य कार्यालयात व सर्व शाखांमधील नोटीस बोर्डवर प्रसिद्ध केले आहे, वार्षिक अहवाल सभासदांचे मागणीवरुन उपलब्ध करुन दिला जाईल. तसेच तो संस्थेच्या वेबसाईट www.parshwanathpatsanstha.com वर प्रसिद्ध केला आहे.

२) सभेच्या नियोजित वेळेपासून अर्ध्या तासापर्यंत गणपुर्ती न झालेस सभा तहकुब केली जाईल व तहकुब झालेली सभा, त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेतली जाईल पण त्या सभेस गणपुर्तीची वा स्वतंत्र सुचनेची आवश्यकता राहणार नाही.

३) सभासदांना विषयपत्रिकेत नमुद केलेल्या विषयांच्या अनुषंगाने काही प्रश्न विचारावयाचे असलेस ते दिनांक ०९ सप्टेंबर २०२५ पूर्वी लेखी स्वरूपात संस्थेचे मुख्य कार्यालयात आणून द्यावेत.

४) सभासदांनी आपले नाव, पत्ता, मोबाईल नंबर, ईमेल आयडी, इ.ची तपशिलवार माहिती लेखी स्वरुपात मुख्य कार्यालयाकडे द्यावी, जेणेकरुन त्यांच्याशी त्वरीत संपर्क साधता येईल.

✻ सभासदांना सभेस उपस्थित राहिल्याबाबतचे उपस्थिती प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. सदर उपस्थिती प्रमाणपत्र सुचना पत्राचा भाग असल्याने सभेची सुचना प्रत बरोबर असल्याशिवाय सभागृहात प्रवेश दिला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

## संचालक मंडळ

**श्री. सुहास शांतीलाल शाह**
चेअरमन

**श्री. राजेश भिकालाल मेहता**
व्हा. चेअरमन

| | |
|---|---|
| श्री. राजीव मणिलाल शाह | संचालक |
| श्री. अतुल केशवलाल दोशी | संचालक |
| श्री. कांतीलाल तिलोकचंद ओसवाल | संचालक |
| श्री. सुहास शांतीलाल शाह (नेर्लेकर) | संचालक |
| श्री. गिरीश बाबुलाल शाह | संचालक |
| श्री. सुनिल कांतीलाल शाह | संचालक |
| डॉ. श्री. प्रशांत पोपटलाल शाह | संचालक |
| श्री. चेतनकुमार कांतीलाल शाह | संचालक |
| सौ. सुचिता महेंद्रकुमार शाह | संचालिका |
| सौ. आरती स्वप्निल शाह | संचालिका |
| श्री. हरिभाऊ भिमराव करडे | संचालक |
| श्री. राकेश लालचंद शाह | संचालक |
| श्री. भुषण नरेंद्र शाह | संचालक |

## सल्लागार समिती

**शाखा गुरूवार पेठ**
श्री. भुपेंद्रकुमार विनोदचंद्र मेहता
श्री. संजय चंद्रकांत शाह (विहेकर)
श्री. नंदन हिराचंद शाह

**शाखा शनिवार पेठ**
श्री. दिपक बाबुलाल मेहता
श्री. अनिल कल्याणजी पटेल
श्री. मोहित धन्यकुमार शाह

**शाखा सातारा**
श्री. चंद्रकांत कांतीलाल शाह
श्री. महेंद्रकुमार मनसुखलाल शाह
श्री. राजेंद्र सुमतीलाल शाह (खटाव)

**शाखा मलकापूर**
श्री. राजेंद्र रतनचंद देसाई

**शाखा स्टेशन रोड**
डॉ. श्री. तुषार चंद्रकांत दोशी
श्री. दिनेश केशवलाल शाह

**शाखा मार्केट यार्ड**
श्री. शिवाजी रामचंद्र पवार
श्री. अर्जुन शंकर पाटील
डॉ. श्री. राम मुळचंद जेठमलानी
डॉ. श्री. दिलीप कोंडीबा पाटील
श्री. केतन रमणिकलाल शाह

| | | |
|---|---|---|
| ✶ वैधानिक लेखापरिक्षक | : | श्री. निनाद प्रदीपकुमार शहा, चार्टर्ड अकौंटंटस् ,कराड. |
| ✶ अंतर्गत लेखापरिक्षक | : | मे. पी. एल. कुलकर्णी आणि कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस् ,कराड.<br>मे. विनोद एल. सावंत आणि कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस् ,कराड.<br>मे. व्ही आर लाटकर ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस्, कराड<br>मे. अक्षय तारळेकर ॲण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंटस्, कराड<br>अजिंक्य क्षीरसागर ॲण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंटस्, सातारा |
| ✶ टॅक्स ऑडीटर | : | श्री. अनिल एस. कुलकर्णी ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस्, कराड. |
| ✶ कायदे सल्लागार | : | नोटरी व ॲड श्री. राजेंद्र सी.शाह , नोटरी व ॲड. सौ.उषा रोहित भेदा, ॲड. श्री. ए.टी.घाटे, ॲड.श्री. डी.एच.पवार, ॲड. धनंजय खुर्जेकर, ॲड. श्री. अरविंद शाह. |
| ✶ सोने – चांदी मूल्यांकन | : | मे.स्वरूपचंद कृष्णाजी ओसवाल, मे.सोनिग्रा ज्वेलर्स, मे.एम.ए. मुखेडकर, कराड<br>मे. घोडके सराफ सातारा |
| ✶ इमारत मूल्यांकन | : | श्री. संजय ओसवाल, कुशिरे असोसिएटस्, |
| ✶ बँकर्स | : | दि सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कराड<br>दि कराड अर्बन को–ऑप. बँक लि., कराड |

दि. ०१-०४-२०२४ ते दि. ३१-०३-२०२५

# * छत्तीसाव्या वर्षाचे प्रतिवृत्त व ताळेबंद *

**सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,**

संस्थेच्या ३६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये संचालक मंडळाचे वतीने मी आपले स्वागत करतो. दिनांक ३१/०३/२०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षित ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व वार्षिक अहवाल या सभेपुढे ठेवणेस संचालक मंडळास विशेष आनंद होत आहे.

बँका, पतसंस्थांची वाढती व्याप्ती व व्यावसायिक स्पर्धा, ठेव व कर्जाचे व्याजदरामधील चढ-उतार, ग्राहकांना बँकांकडून मिळणाऱ्या विविध तांत्रिक सुविधा यामुळे बँकिंग क्षेत्रात तीव्र स्पर्धा निर्माण झालेली आहे. याउपरांत आपल्या संस्थेस गतवर्षाच्या तुलनेत एकूण व्यवसायवृद्धी चांगली राखणेत यश संपादन झालेले आहे. संस्थेच्या या प्रगतीमध्ये संस्थेचे सर्व सभासद, असंख्य ठेवीदार, कर्जदार, ग्राहक, हितचिंतक, आजी-माजी संचालक, सेवक वर्ग यांचा सिंहाचा वाटा आहे.

जागतिक पातळीवर विविध देशांमधील युद्धजन्य परिस्थिती, वाढती महागाई त्यामुळे विविध देशांच्या अर्थव्यवस्था मंदीच्या गडद छायेखाली असताना देखील, केंद्र शासनाचे मजबूत ध्येय-धोरणामुळे व आर. बी. आय. ने उचललेल्या विविध पावलांमुळे, गत आर्थिक वर्षात, भारताचा सकल राष्ट्रीय उत्पादन दर (GDP) हा गतवर्षाचे तुलनेत मजबूत झाला आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था वाढीस चांगली चालना मिळाली आहे. या आर्थिक वर्षात देशांतर्गत महागाईत काही प्रमाणात घट झाली असली तरीही महागाईवर नियंत्रण ठेवणे कामी व बँकांमधील व्याजदरातील तीव्र स्पर्धा रोखणेसाठी आर.बी.आय. ने रेपो रेट स्थिर ठेवला आहे.

ठेव व कर्जाच्या व्याजदरामध्ये सहकारी बँका, पतसंस्था या व्यापारी व राष्ट्रीयकृत बँकेबरोबर स्पर्धा करू शकत नाही. याउपरांत आपल्या संस्थेने ठेव व कर्ज योजनांमध्ये योग्य समन्वय साधून ग्राहकाभिमुख सेवा देणेचे दृष्टीने ठेव व कर्ज योजनांसाठी आकर्षक असे व्याजदर ठरविले आहेत. याचा सभासद, ठेवीदार व ग्रहकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, ही विनंती.

गत ३५ वर्षांचा मागोवा घेता आपल्या संस्थेच्या माजी व विद्यमान संचालक मंडळाने वेळोवेळी अद्यावत तंत्रज्ञानाचा स्विकार करून व्यवसायामध्ये गतीमानता आणली. ग्राहकांच्या वाढत्या अपेक्षा व त्यांचे समाधानाकरीता वेळोवेळी व्यवस्थापनाने घेतलेले तत्पर व सुयोग्य निर्णय, शाखा विस्तार, बदलत्या परिस्थितीनुसार शाखांचे केलेले सुशोभिकरण यासारखे बदल आत्मसात केल्यामुळे तसेच संचालक मंडळाचे सदैव परिपूर्ण व पारदर्शक सहकार्य, सेवकांची नम्र व आपुलकीची सेवा आणि सभासद, ठेवीदार, ग्राहक यांना या सेवेतून मिळणारे समाधान हेच या सर्वांगीण प्रगतीचे द्योतक आहे.

## * संचालक मंडळ सभा :

अहवाल सालात संचालक मंडळाच्या एकूण २७ सभा झाल्या त्यामध्ये संचालक मंडळाची उपस्थिती समाधानकारक होती.

## * सर्वसाधारण सभा :

संस्थेची पस्तीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १२ सप्टेंबर २०२४ रोजी यशवंतराव चव्हाण स्मृती सदन (टाऊन हॉल), कराड येथे खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. सभेपुढील सर्व विषयांवर विस्तृत व सांगोपांग चर्चा होऊन ते सर्वानुमते मंजूर करणेत आले आहेत.

## * वसुल व भरणा केलेले भागभांडवल :

अहवाल सालाचे प्रारंभी संस्थेचे एकूण वसुल भागभांडवल रु. १,९४,१९,२००/- एवढे होते. त्यामध्ये रु. ३४,८६,०००/- ची वाढ होऊन साल अखेर एकूण वसूल व भरणा केलेले भागभांडवल रु.२,२९,०५,२००/- एवढे झाले आहे.

## * राखीव व इतर निधी :

अहवाल सालाचे सुरुवातीस राखीव व इतर निधी रु.४६६४.२३ लाख एवढे होते. अहवाल सालात त्यामध्ये रु. २१५.७७ लाख एवढी वाढ होऊन साल अखेर राखीव व इतर निधी रु. ४८८०.०० लाख इतके झाले आहे. त्या पैकी संस्थेने राखीव निधीची सहकारी कायद्यातील तरतूदीनुसार संपुर्णपणे स्वतंत्र अशी गुंतवणूक केली आहे.

## * ठेवी :

अहवाल सालाचे सुरुवातीस संस्थेच्या एकूण ठेवी रु.११६१२.०८ लाख एवढ्या होत्या. त्यामध्ये रुपये ९४०.०० लाख

एवढी वाढ होऊन साल अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रु.१२५५२.०८ लाख एवढ्या झाल्या आहेत. संस्थेकडील ठेवींची निकोप वाढ होणेचे दृष्टीने संस्थेने बँकिंग व्यवसायातील स्पर्धेस अनुसरून आकर्षक व्याजाच्या ठेव योजना राबविल्या आहेत. संस्थेच्या सभासदांनी आपले सर्व दैनंदीन आर्थिक व्यवहार आपले संस्थेमार्फतच करावे अशी मी आपणा सर्वांना विनंती करीत आहे.

### * व्याज दर :

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या पतधोरणानुसार व बँक दरातील बदलत्या व्याज दराबरोबर सहकारी बँकाप्रमाणे पतसंस्थांनाही कर्ज व ठेव योजनांचे व्याजदरात वेळोवेळी बदल करावे लागतात. बँकिंग व्यवसायातील तीव्र स्पर्धा, ठेवीदारांचे हित व बाजारपेठेतील आर्थिक परिस्थिती याचा सारासार विचार करून संस्थेचे संचालक मंडळाने ठेवी व कर्जावरील व्याज दर आकर्षक असे ठरविले आहेत. याचा सभासद व ग्राहक यांनी जास्तीत जास्त फायदा घ्यावा. ज्या कर्जदारांनी संस्थेकडून घेतलेल्या कर्जाचे मासिक हप्ते व व्याज नियमित परतफेड केलेले नाही अशा कर्ज खात्यांवर संस्थेस दंड व्याज आकारणी करणे भाग पडले आहे.

### * कर्जे :

कराड, सातारा, सांगली, कोल्हापूर व पुणे शहर व तेथील ग्रामीण भागास आर्थिक चालना मिळावी, तेथील जनतेचे राहणीमान उंचवावे, स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा, उद्योगधंदे, कारखाने, व्यापार-उदीम इ. मध्ये वृद्धी व्हावी, याकरिता संस्थेने सभासदांना भरीव अर्थसहाय्य केले आहे. त्याचप्रमाणे संस्थेने सोने तारण, मुदत ठेव तारण,सरकारी ऋणपत्रे, एल.आय.सी.पॉलीसी इ.चे तारणावर अत्यल्प दरात अर्थसहाय्य केले आहे. नवीन घरगुती वापराच्या दुचाकी व चार चाकी वाहन खरेदीसाठी स्वतंत्र अत्यल्प व्याजदराची कर्ज योजना राबविली आहे. घरगुती वापराच्या वस्तु, संगणक व मशिनरी इ. खरेदीसाठी अर्थसहाय्य देवू केले आहे. व्यापारी वर्गास मालाचे तारणावर कॅश क्रेडीट कर्ज व माल तारण कर्ज (प्लेज लोन) देवू केले आहे. नविन घर बांधणी अथवा फ्लॅट, दुकान गाळा खरेदी करिता अत्यल्प व्याजदरात भरघोस अर्थसहाय्य केले आहे.

अहवाल सालाचे सुरुवातीस संस्थेने एकूण ९७२३.४८ लाख एवढे कर्ज वाटप केले होते. त्यामध्ये रु. ११४१.५८ लाख एवढी वाढ होऊन साल अखेर संस्थेस एकूण येणे कर्ज रु. १०८६५.०६ लाख एवढे दिसत आहे.

### * अनुत्पादक जिंदगी व अनुत्पादित कर्ज व्यवस्थापन :

मे नरसिंहम कमिटीने सुचविले प्रमाणे सर्व बँकांना सन १९९२ पासून अनुत्पादित कर्ज (जिंदगी) यावर तरतुदी करणे अनिवार्य केले आहे. अनुत्पादक जिंदगी म्हणजे ज्या कर्ज खात्यावर, कर्ज दिलेपासून कोणताही व्यवहार झाला नाही, अथवा त्यावरील व्याज रोखीने भरले नाही तर अशा अनुत्पादित कर्ज खात्यांवरील व्याज उत्पन्नामध्ये घेऊ नये असे निकष लागू केले आहेत व अशा वसूल न झालेल्या व्याजाबद्दल संस्थेने त्यांचे नफ्यामधून तरतूद करणे गरजेचे झाले आहे.सर्व नागरी सहकारी पतसंस्थांना मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी जारी केलेले आदेशान्वये दि.०१/०४/२००५ पासून अनुत्पादित जिंदगीचे (कर्ज व गुंतवणूक) निकष जारी केले होते. त्यास अनुसरून एखाद्या कर्जखात्यात ६ महिन्यापेक्षा जास्त काळ कोणताही व्यवहार न झालेस तसेच व्याज रोखीने वसुल न झालेस अशा वसुल न झालेल्या थकित व्याज व कर्ज हप्त्यांपोटी संस्थेने तरतुदी करणे अनिवार्य केले आहे. त्याचप्रमाणे गुंतवणूकीवर नियमित परतावा न मिळालेस त्यासाठी तरतुदी करणे आवश्यक आहे. सदर नियमांचे संस्थेने तंतोतंत पालन केले असून अहवालात नमूद केले प्रमाणे N.P.A. च्या तरतूदी केलेल्या आहेत.

( रु. लाखात)

| वर्ष | निव्वळ एन. पी. ए. रु. | निव्वळ एन.पी.ए.प्रमाण % |
|---|---|---|
| २०२२-२०२३ | ०.०० | ०.०० |
| २०२३-२०२४ | २२.८४ | ०.२३ |
| २०२४-२०२५ | ०.०० | 0.00 |

अहवाल सालात संस्थेने, एन. पी. ए. कर्ज वसुलीचे व्यवस्थापन करुन एन. पी. ए. कर्ज कमी करणे बाबत जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे. संस्थेने वर्षाअखेरीस निव्वळ एन. पी. ए. चे प्रमाण **०.००%** राखण्यात यश संपादन केले आहे .

चालू आर्थिक वर्षात ज्या कर्जदारांनी आपली थकीत कर्जबाकी भरणा केलेली नाही त्यांनी ती सत्वर भरून संस्थेच्या प्रगतीस हातभार लावावा अशी मी त्यांना विनंती करतो. संस्थेने आपली कर्जवसूली यंत्रणा अधिक सक्षम केली आहे. ज्या थकित कर्जदारांनी संस्थेकडून घेतलेल्या कर्जाचे मासिक, त्रैमासिक, वार्षिक हप्ते वेळेवर परतफेड केलेले नाहीत त्यांचेवर संस्थेस नाईलाजास्तव कायदेशीर कारवाई करावी लागत आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

## ❋ गुंतवणूक :

अहवाल सालाचे प्रारंभी संस्थेची एकूण गुंतवणूक रु.६६९६.९५ लाख एवढी होती. त्यामध्ये ४३९.२६ लाख एवढी वाढ होऊन साल अखेर ती ७१३६.२१ लाख एवढी दिसत आहे. सहकार कायद्यातील तरतूदी नुसार संस्थेने रिझर्व्ह फंडाची स्वतंत्र अशी गुंतवणूक दि सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाखा कराड व टी.जे.एस.बी. बँक लि. शाखा कराड येथे जास्तीत जास्त लाभप्रद योजनेमध्ये केली आहे.

## ❋ नफा विभागणी :-

अहवाल सालात संस्थेस एकूण निव्वळ नफा रु.२,७६,२१,९११.९८ इतका झाला आहे. त्यामध्ये मागील सालचा शिल्लक नफा रु. ९१६.११ मिळून एकूण निव्वळ नफा रु.२,७६,२२,८२८.०९ एवढा झाला आहे. या नफ्याची विभागणी पुढीलप्रमाणे करणेस आपणापुढे सादर केली आहे.

| अ.नं. | तपशील | रक्कम रुपये पैसे |
|---|---|---|
| १. | राखीव निधी | ६९,१०,०००-०० |
| २. | लाभांश १३% (प्रपोज्ड) | २७,२९,५९५-०० |
| ३. | इमारत निधी | १,००,०००-०० |
| ४. | लाभांश समीकरण निधी | ४,६०,०००-०० |
| ५. | सेवक कल्याण निधी | ५,००,०००-०० |
| ६. | सभासद कल्याण निधी | २,००,०००-०० |
| ७. | शैक्षणिक शिष्यवृत्ती निधी | १,५०,०००-०० |
| ८. | सार्वजनिक धर्मादाय निधी | २,५०,०००-०० |
| ९. | ग्रॅच्युईटी फंड | ३,८४,३६५-०० |
| १०. | संशयित व बुडीत निधी | १,२९,३८,०४०-०० |
| ११. | गुंतवणूक चढ उतार निधी | ३०,००,०००-०० |
| १२. | पुढील वर्षाकरिता शिल्लक नफा | ८२८-०९ |
| | **एकूण** | **२,७६,२२,८२८-०९** |

वरील प्रमाणे नफा वाटप करण्यास संचालक मंडळाने शिफारस केली आहे. त्यास आपली मान्यता मिळावी.

## ❋ लाभांश :

सन २०२४-२०२५ करिता संचालक मंडळ १३% प्रमाणे लाभांश वाटप करणेबाबत शिफारस करीत आहे. त्यास या सभेची मंजूरी मिळाले नंतर मंजूर लाभांशाची रक्कम प्रती वर्षाप्रमाणे सभासदांचे सेव्हिंग्ज ठेव खाती वर्ग केली जाईल.

## ❋ संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाचा तपशील :

महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा१९६० कलम ७५ (२) नुसार संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांचे कडून अहवालसाल अखेर येणे कर्ज रु. १२.८१ कोटी इतके आहे. त्या पैकी थकबाकी काहीही नाही.

## ❋ शाखा स्थिती :

अहवाल सालात संस्थेच्या खालील सर्व शाखा आर्थिक दृष्ट्या सक्षम व स्वयंपुर्ण आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती पुढीलप्रमाणे

(रू. लाखात)

| अ.नं. | शाखा | ठेवी | कर्जे | नफा | तोटा |
|---|---|---|---|---|---|
| १. | हेड ऑफिस | --- | --- | ७७.३२ | --- |
| २. | गुरुवार पेठ | ४३८३.०५ | २९६२.६४ | ३०.५९ | --- |
| ३. | शनिवार पेठ | २३१८.३१ | १६६७.७३ | २९.६८ | --- |
| ४. | सातारा | ११५२.३२ | १५२३.०३ | ५२.९८ | --- |
| ५. | मलकापूर | ७४७.०० | ४७७.४४ | ७.३४ | --- |
| ६. | मार्केट यार्ड | १५२१.६१ | १५०७.५८ | २४.३० | --- |
| ७. | स्टेशन रोड | २३५०.५९ | २३३१.८७ | ६१.३० | --- |
| ८. | पुणे | ७९.२० | ३९४.७७ | --- | ७.२८ |
| | **एकूण** | **१२५५२.०८** | **१०८६५.०६** | **२८३.५१** | **७.२८** |

## ❋ लेखा परिक्षण :

संस्थेचे सन २०२४-२५ चे वैधानिक लेखापरिक्षण मे.निनाद पी. शहा ॲण्ड कं., चार्टर्ड अकौटंट्स, कराड यांनी पूर्ण केले असून त्यांनी संस्थेचा सन २०२४-२५ करिता लेखापरिक्षण वर्ग **'ब'** प्रदान केला आहे.

संस्थेचे सन २०२४-२०२५ चे अंतर्गत लेखापरिक्षण खाली नमूद केले चार्टर्ड अकौटंट्स यांनी तिमाही पद्धतीने पूर्ण केले असून त्यांनी त्यांचे शाखावार तिमाही लेखापरिक्षण अहवाल संस्थेस सादर केले आहेत.

| अ.नं. | शाखा | अंतर्गत लेखापरिक्षक |
|---|---|---|
| १. | मुख्य कार्यालय व शाखा शनिवार पेठ | मे. पी.एल. कुलकर्णी आणि कंपनी, सी.ए., कराड. |
| २. | शाखा गुरुवार पेठ, शाखा मलकापूर व शाखा पुणे | मे. विनोद एल. सावंत ॲण्ड कं. सी.ए., कराड. |
| ३. | शाखा सातारा | अजिंक्य क्षीरसागर ॲण्ड असो. सी.ए., सातारा |
| ४. | शाखा मार्केट यार्ड | मे. अक्षय तारळेकर ॲण्ड असो., सी.ए.,कराड |
| ५. | शाखा स्टेशन रोड | मे. व्ही. आर. लाटकर ॲण्ड कं. सी.ए.,कराड |

लेखापरिक्षण कालावधीत लेखापरिक्षक यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त करुन काही मार्गदर्शनपर सूचना केल्या

आहेत, त्याबद्दल संचालक मंडळ त्यांचे अत्यंत आभारी आहे.

सन २०२३-२०२४ चे टॅक्स ऑडिट चे काम मे.अनिल एस. कुलकर्णी आणि कंपनी, चार्टर्ड अकौंटंट्स, कराड यांनी पूर्ण केले असून त्यांनी त्यांचा टॅक्स ऑडीट रिपोर्ट संस्थेस सादर केला आहे.

### * सभासद अपघात विमा योजना :

प्रतिवर्षाप्रमाणे संस्थेने युनायटेड इंडीया इन्शुरन्स कंपनी लि.,कराड यांचे सहकार्याने सर्व सभासदांकरिता व्यक्तीगत अपघात विमा योजना राबविली आहे. तसेच गतवर्षीप्रमाणे यावर्षीही संस्थेचे (वय वर्षे ७० चे आतील) सर्व सभासदांचा प्रत्येकी **रू.१,००,०००/- रक्कमेचा अपघाती विमा** उतरविला आहे.

### * संस्थेमार्फत सेवकांना देण्यात येणाऱ्या आर्थिक सुविधा :

प्रतिवर्षाप्रमाणे संस्थेमार्फत सेवकांना खालील आर्थिक सुविधा देणेत आल्या आहेत.

१. भविष्य निर्वाह निधी योजना.
२. ग्रुप ग्रॅच्युईटी योजना.
३. अपघात विमा योजना, फॅमिली फ्लोटर मेडिक्लेम योजना.
४. बोनस/सानुग्रह अनुदान, इन्सेंटीव्ह इ.

### * आधुनिक तंत्रज्ञान :

आपल्या संस्थेच्या सर्व शाखा सन १९९५ पासून संगणकीकृत आहेत. परंतु संस्थेने आधुनिक बँकिंगच्या सर्व अत्याधुनिक सेवा सभासदांना उपलब्ध करुन देणेचे हेतूने 'विन्डोज बेस कोअर बँकिंग संगणक प्रणाली' कार्यान्वित केली आहे.

संस्थेने सभासदांच्या सोयीसाठी ICICI बँकेचे सहकार्याने स्वत:चे मोबाईल ॲप विकसीत केले असून त्याद्वारे RTGS, NEFT, IMPS, UPI Inward, Outward इ. द्वारे फंड ट्रान्सफर व रिसीव्ह करणेची सुविधा विनामुल्य सुरु केली आहे. तसेच e-payment of Taxes, Utility Bill Payment, e-stamping Registration Fee इ. भरणा करण्याची सोय अत्यल्प दरात नियमित सुरु आहे याचा सभासदांनी लाभ घ्यावा.

संस्थेची अद्ययावत स्वरुपात वेबसाईट (www.parshwanathpatsanstha.com) या नावे सुरु असून त्यावर संस्थेबाबतची सर्व माहिती सभासदांसाठी उपलब्ध केली आहे.

### * सामाजिक बांधिलकी :

संस्थेने सामाजिक बांधिलकी व ऋण जोपासणेचे दृष्टीने समाजातील होतकरू व गरजू शालेय विद्यार्थ्यांना आवश्यक ती मदत केली आहे. तसेच प्रसंगानुरूप गरजु व्यक्तींना शस्त्रक्रिया, वैद्यकीय कारणांकरिता, अंध व अपंग विद्यार्थ्यांना, क्रीडा स्पर्धांना सढळ हस्ते मदत दिली आहे. तसेच विविध समाज उपयोगी कार्यक्रमात सहभागी होऊन सहकार्य केले आहे.

सभासद व त्यांचे कुटुंबियांना आजारपणात रुग्णालयातून घरी विश्रांती घेत असतेवेळी **विविध वैद्यकीय उपकरणे, साधनसामुग्री** तात्पुरत्या स्वरुपात वापरासाठी विकत अथवा भाड्याने घ्यावी लागते, वापरानंतर त्याची उपयोगशुन्यता व त्यासाठी मोजावी लागणारी किंमत याचा सारासार विचार करुन संस्थेने सामाजिक बांधिलकीचे हेतूने अशी वैद्यकीय उपकरणे **तात्पुरत्या स्वरुपात वापरण्यासाठी मोफत पुरवण्याचा उपक्रम संस्थेमार्फत हाती घेतला आहे**. त्याचा सभासदांनी जास्तीत-जास्त उपयोग करुन घ्यावा, ही विनंती.

### * अभिनंदन :

फेब्रुवारी, मार्च २०२५ मध्ये संपन्न झालेल्या शालेय व माध्यमिक शालांत परिक्षांमध्ये (एस.एस.सी. व एच.एस.सी.) आपल्या संस्थेचे सभासदांच्या पाल्यांनी मिळविलेल्या भरघोस यशाबद्दल त्याचे मन:पूर्वक अभिनंदन, त्याचप्रमाणे या सहकारी वर्षामध्ये ज्या सभासदांचे पाल्य पदवीधर / डीप्लोमा होल्डर झाले असतील तसेच त्यांनी क्रीडा, सांस्कृतिक, कला, नृत्य व गायन या क्षेत्रात यश मिळविले असेल अशा सर्वांचे मन:पुर्वक अभिनंदन.

### * श्रद्धांजली :

अहवाल सालात जे ज्ञात, अज्ञात, सभासद, ग्राहक, ठेवीदार, हितचिंतक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या थोर व्यक्ती, समाजसुधारक, सैनिक, सामाजिक कार्यकर्ते पंचत्वात विलीन झाले. त्यांचे पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली!

### * आभार व समारोप :

संस्थेचे सर्व माजी संचालक व पदाधिकारी यांनी वेळोवेळी संस्थेस दिलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार!

अहवाल सालात खालील मान्यवर व्यक्तींनी संस्थेस मोलाचे मार्गदर्शन केले आहे त्याबद्दल आम्ही त्यांचे शतश: आभारी आहोत.

☆ मा. श्री. दिपक तावरे साहेब, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे

☆ मा. श्री. श्रीकृष्ण वाडेकर साहेब, अप्पर आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे

☆ मा. श्री. अरुण काकडे साहेब, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर

☆ मा. श्री. संजयकुमार सुद्रीक साहेब, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा

☆ मा. सौ. अपर्णा यादव मॅडम, उपनिबंधक, सहकारी संस्था, कराड

त्याचप्रमाणे आयुक्त व निबंधक सहकारी संस्था कार्यालय पुणे, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था कोल्हापूर ,जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सातारा व कराड कार्यालय व त्यांचे सहकारी यांनी संस्थेस वेळोवेळी मागदर्शन केले आहे व त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

संस्थेचे अंतर्गत लेखा परिक्षक श्री. पी. एल. कुलकर्णी, श्री. विनोद एल. सावंत सी. ए. कराड, श्री. व्ही. आर. लाटकर व श्री. अक्षय तारळेकर चार्टर्ड अकौटंटस्, कराड, श्री. अजिंक्य क्षीरसागर, चार्टर्ड अकौटंटस्, सातारा व त्यांचे सहकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्य व मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

संस्थेचे टॅक्स ऑडीटर मे. अनिल एस. कुलकर्णी, चार्टर्ड अकौंटंटस् कराड यांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्य व मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचे मन:पुर्वक आभार मानतो.

संस्थेच्या विकासास व प्रगतीस हातभार लावणाऱ्या सर्व सभासद ग्राहक, ठेवीदार व हितचिंतक या सर्वांचे मन:पूर्वक आभार, त्याचप्रमाणे संस्थेचे कायदे सल्लागार ॲड.श्री. आर. सी. शाह, ॲड सौ. उषा आर. भेदा, ॲड. श्री ए. टी. घाटे सर्व रा. कराड ॲड श्री. डी. एच. पवार रा. सातारा, ॲड. श्री. सी. डी. माने सांगली, ॲड. धनंजय खुर्जेकर, श्री. अरविंद शहा रा. पुणे, इमारत मुल्यांकन करणारे श्री. संजय ओसवाल, कुशिरे असोसिएट, सोने–चांदी मूल्यांकन करणारे मे. स्वरूपचंद कृष्णाजी ओसवाल, मे. सोनिग्रा ज्वेलर्स, मे. एम. ए. मुखेडकर रा. सर्व कराड, मे. घोडके सराफ सातारा यांनी संस्थेस वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार.

संस्थेचे दैनंदीन व्यवहारामध्ये विविध बँकर्सनी दिलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

संस्थेने राबविलेली सभासद अपघात विमा योजना व संस्थेचे इतर विम्याचे कामकाजाबाबत संस्थेस वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य दिल्याबद्दल युनायटेड इंडिया इन्श्युरन्स कंपनी लि., कराड व दि न्यु इंडिया एशोरन्स कंपनी लि., कराड यांचे शाखाधिकारी व त्यांचे सहकारी यांचे मन:पुर्वक आभार तसेच संस्थेचे सेवक ग्रुप ग्रॅच्युईटी योजनेकामी सहकार्य दिल्याबद्दल एल.आय.सी. ऑफिस सातारा यांचे मन:पूर्वक आभार.

संस्थेच्या प्रगतीकरिता दिलेल्या योगदानाबद्दल संस्थेचा सर्व सेवक वर्ग व पिग्मी एजंटस् यांचा मी मन:पूर्वक आभारी आहे.

संस्थेचे प्रगतीकरिता ज्या मान्यवर व्यक्तींनी वेळोवेळी सहकार्य दिले आहे परंतू अनवधानाने त्यांचे आभार मानावयाचे राहीले असतील तर अशा सर्व मान्यवर व्यक्तींचे मन:पूर्वक आभार.

मी संचालक मंडळाचे वतीने दि. ३१ मार्च २०२५ रोजीचा ताळेबंद व नफा तोटा पत्रक आपणापुढे मंजूरीसाठी सादर करीत आहे. त्यास मान्यता द्यावी, ही नम्र विनंती.

आपला सहकारी

**श्री. सुहास शांतीलाल शाह**

चेअरमन

# हिशोब पद्धतीची माहिती

**प्रमुख हिशोबी धोरणे** (Significant Accounting Policies) संस्थेची प्रमुख हिशोबी धोरणे पुढीलप्रमाणे :-

## १) हिशोबाची मुलतत्वे :

संस्थेचे हिशोब व आर्थिक पत्रके ही प्रामुख्याने आयकर कायदा कलम १४५ (१) अन्वये व्यापारी पद्धतीचा (Mercantile System) अवलंब करुन ठेवलेली आहे.

## २) गुंतवणूक :

१) सहकार खात्याने नागरी सहकारी पतसंस्थांकरीता गुंतवणूक विषयी दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार संस्थेची गुंतवणूक पुढीलप्रमाणे नोंदविली आहे.

अ) सहकारी, शेड्युल्ड सहकारी, कमर्शियल व राष्ट्रीयकृत बँकांमधील मुदत ठेवीमध्ये केलेली दीर्घकालीन गुंतवणूक ही ताळेबंदात खरेदी किंमतीत दर्शविली आहे.

२) सर्व गुंतवणूकीवरील व्याज व्यापारी पद्धतीने नोंदविले आहे.

## ३) कर्जे :

सहकार खात्याच्या मार्गदर्शक तत्वानुसार कर्जाची उत्पादीत (Standard), दुय्यम (Sub Standard), संशयित (Doubtful), बुडीत (Loss Assets) कर्जे अशाप्रकारे वर्गीकरण केलेले असून, सदर कर्जावर संस्थेने सहकार खात्याच्या मार्गदर्शक तत्वानुसार आवश्यक ती तरतूद केली आहे.

## ४) स्थिर मालमत्ता व घसारा :

१. ताळेबंदामध्ये ऑफिस इमारतीचे मुल्य खरेदी दराप्रमाणे दर्शविले आहे.

२. संस्थेने आपल्या मालकीच्या ऑफिस इमारतीचे दिनांक ३१ मार्च २००९ रोजी पुन:मुल्यांकन केले असून या मालमत्तेची बाजारभावाप्रमाणे होणारी किंमत व ताळेबंदात दर्शविलेली मुळ खरेदी किंमत यातील फरक इमारत पुन:मुल्यांकन खाते व इमारत पुन:मुल्यांकन निधी म्हणून ताळेबंदात दोन्ही बाजूस दर्शविली आहे. संस्थेने इमारतीचे पुन:मुल्यांकनावर सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये आयकर कायद्यातील तरतुदीनुसार घसारा आकारला आहे.

३. चल मालमत्ता या पुस्तकी किंमतीमधुन घसारा वजा जाता शिल्लक असणाऱ्या किंमतीस ताळेबंदात दर्शविलेल्या आहेत.

४. संस्थेच्या चल मालमत्तेवरील घसारा हा घटत्या पध्दतीचा वापर करुन (Written Down Value Method) नोंदविला आहे व घसारा हा आयकर कायद्यातील तरतुदीप्रमाणे आकारला आहे.

## ५) उत्पन्न व खर्च संकल्पना :

अ) उत्पन्नाच्या सर्वसाधारण मुख्य बाबी या प्रामुख्याने येणे पध्दतीने हिशोबात घेतल्या आहेत. परंतु खालील उत्पन्नाच्या किरकोळ बाबी रोख वसुली पद्धतीने विचारात घेतलेल्या आहेत.

१) अनुत्पादीत कर्जावरील व्याज २) प्रोसेसिंग फी ३) सर्व्हिस, इन्सिडेंटल चार्जेस ४) कमिशन इ.

ब) नफा तोटा पत्रकात दर्शविलेले खर्च नोंदविताना प्रामुख्याने व्यापारी पध्दतीचा वापर (Mercantile System) केलेला आहे. (P.A. कर्जाबाबतची तरतुद सहकार खात्याच्या निकषाप्रमाणे केली आहे.)

## ६) शिल्लक छपाई :

संस्थेकडे दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर शिल्लक असणाऱ्या छपाईची प्रत्यक्ष मोजदाद करुन शिल्लक छपाई खरेदी दराने हिशोबात नोंदविली आहे.

## ७) सेवक निवृत्तीचे फायदे व सेवक बोनस बाबत :

भविष्य निर्वाह निधी कायद्यानुसार सेवक भविष्य निर्वाह निधी व फॅमिली पेन्शन फंड हा मा. आयुक्त, भविष्य निर्वाह निधी कार्यालय, कोल्हापूर यांचेकडे भरलेला आहे. तसेच संस्थेने एल. आय. सी. ऑफ इंडिया, शाखा-सातारा कार्यालयाकडे सेवकांचे हिताचा विचार करुन ग्रुप ग्रॅच्युईटी इन्शुरन्स पॉलीसी घेतली असून त्याचा विमा हप्ता एल. आय. सी. ऑफ इंडिया, शाखा-सातारा येथे भरलेला आहे. त्याचप्रमाणे पेमेंट ऑफ बोनस ॲक्ट १९२५ चे तरतुदीनुसार सेवकांना बोनस व संचालक मंडळाचे शिफारसीनुसार सानुग्रह अनुदान देणेबाबत तरतूद केली आहे.

## - संस्थेची सांपत्तिक स्थिती -

(✻ व्यतिरिक्त सर्व आकडे लाखामध्ये )

| तपशील | २०२०-२०२१ | २०२१-२०२२ | २०२२-२०२३ | २०२३-२०२४ | २०२४-२०२५ |
|---|---|---|---|---|---|
| सभासद ✻ | ३१४५ | ३१९६ | ३३६४ | ३५५५ | ३६३२ |
| शाखा ✻ | ७ | ७ | ७ | ६ | ६ |
| सेवक ✻ | ५८ | ५५ | ५५ | ५१ | ५२ |
| ऑडिट वर्ग ✻ | "अ" | "अ" | "अ" | "ब" | "ब" |
| लाभांश ✻ | १५% | १५% | १५% | १५% | १३% (प्रपोजड्) |
| भागभांडवल | १६५.०० | १७४.४१ | १७८.०९ | १९४.१९ | २२९.०५ |
| राखीव निधी | ९१५.९५ | ९७१.७४ | १०३३.१९ | १०९१.५२ | ११५५.५५ |
| इतर निधी | ३११९.७९ | ३२३१.७८ | ३३८०.६७ | ३५७२.७१ | ३७२४.४५ |
| ठेवी | ११०७५.९१ | ११३२६.९९ | ११०२७.२१ | ११६१२.०८ | १२५५२.०८ |
| कर्जे | ८३२५.६७ | ८७४१.०१ | ८४२३.९३ | ९७२३.४८ | १०८६५.०६ |
| गुंतवणूक | ७२४६.८३ | ७४९१.३७ | ७१४३.९६ | ६६९६.९५ | ७१३६.२१ |
| खेळते भांडवल | १६७९९.२२ | १७४०४.६० | १६६१३.३६ | १७७९०.७२ | १९४२९.६५ |
| निव्वळ नफा | २२२.५२ | २४४.७८ | २३२.५४ | २५५.२३ | २७६.२३ |
| निव्वळ एन पी ए प्रमाण✻ | ०.००% | ०.००% | ०.००% | ०.२३% | ०.००% |

## ✻ आर्थिक प्रमाणके ✻

| अ.नं. | तपशील | वर्ष २०२३-२०२४ | वर्ष २०२४-२०२५ |
|---|---|---|---|
| १) | एकूण उत्पन्नाचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण | ७.८१ % | ७.५२ % |
| २) | व्याज खर्चाचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण | ४.७० % | ४.८३ % |
| ३) | व्यवस्थापकीय व प्रशासकीय खर्चाचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण | १.२४ % | १.२५ % |
| ४) | तरतुदीचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण | ०.४४ % | ०.०१ % |
| ५) | निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण | १.४३ % | १.४२ % |
| ६) | भागभांडवलाचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण | १.०९ % | १.१८ % |
| ७) | राखीव व इतर निधींचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण | २६.२२ % | २५.११ % |
| ८) | एकूण ठेवीचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण | ६५.२७ % | ६४.६० % |
| ९) | एकूण गूंतवणूकीचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण | ३७.६४ % | ३६.७२ % |
| १०) | एकूण कर्जाचे ठेवीशी शेकडा प्रमाण | ८३.७४ % | ८६.५६ % |
| ११) | प्रती सेवक व्यवसाय (रू.लाखात) | ४१८.३४ | ४५०.३३ |
| १२) | प्रती सेवक निव्वळ नफा (रू.लाखात) | ५.०० | ५.३१ |
| १३) | प्राथमिक व्याज दर | १३.०० % | १३.०० % |
| १४) | कर्जावरील सरासरी उत्पन्न | ११.१८ % | १०.४५ % |
| १५) | गुंतवणूकीवरील सरासरी उत्पन्न | ५.२३ % | ५.८१ % |
| १६) | ठेवीवरील सरासरी देय व्याज | ७.३० % | ७.८५ % |
| १७) | व्याज उत्पन्नाचे एकूण उत्पन्नाशी प्रमाण | ९८.४९ % | ९८.६१ % |
| १८) | इतर उत्पन्नाचे एकूण उत्पन्नाशी प्रमाण | १.५१ % | १.३९ % |
| १९) | व्याज खर्चाचे एकूण उत्पन्नाशी प्रमाण | ६०.१३ % | ६४.२९ % |
| २०) | व्यवस्थापकीय खर्चाचे एकूण उत्पन्नाशी प्रमाण | १५.९२ % | १६.६३ % |
| २१) | तरतुदीचे एकूण उत्पन्नाशी शेकडा प्रमाण | ५.५८ % | ०.१७ % |
| २२) | निव्वळ नफ्याचे एकूण उत्पन्नाशी प्रमाण | १८.३७ % | १८.९१ % |




# एकत्रित ताळेबंद पत्रक

| ३१ मार्च २०२४ रुपये | पैसे | भांडवल व देणी | रुपये | पैसे | ३१ मार्च २०२५ रुपये | पैसे |
|---|---|---|---|---|---|---|
| २,००,००,००० | ०० | **अधिकृत भागभांडवल** | | | **४,००,००,०००** | **००** |
| | | रु.१०० चे ४,००,००० भाग | | | | |
| १,९४,१९,२०० | ०० | **१. वसूल व भरणा केलेले भाग भांडवल** | | | **२,२९,०५,२००** | **००** |
| | | रु.१०० चे २,२९,०५२ भाग | २,२९,०५,२०० | ०० | | |
| | | **२. राखीव व इतर निधी** | | | **४८,८०,००,४०८** | **३२** |
| १०,९१,५२,२२५ | ९४ | १. राखीव निधी | ११,५५,५५,३०५ | ९४ | | |
| १३,११,००,००० | ०० | २. इमारत निधी | १३,१४,००,००० | ०० | | |
| ४२,५२,०१२ | ०० | ३. लाभांश समीकरण निधी | ४६,४२,०१२ | ०० | | |
| ५,२०,१०६ | ०० | ४. स्टाफ वेलफेअर फंड | ६,७८,३१३ | ०० | | |
| १७,३९,०४२ | ०० | ५. सभासद कल्याण निधी | १७,९९,०३२ | ०० | | |
| २,८३,५९६ | ०० | ६. शैक्षणिक शिष्यवृत्ती निधी | २,१६,९३६ | ०० | | |
| १४,५६,४०३ | ०० | ७. सार्वजनिक धर्मादाय निधी | १३,१८,४०३ | ०० | | |
| १,७७,२२,६५२ | ७७ | ८. इमारतीवरील घसारा निधी | १,७७,२२,६५२ | ७७ | | |
| १०,५३,०२,००२ | १८ | ९ अ.संशयित व बुडीत (कर्ज निधी) | ११,००,०२,००२ | १८ | | |
| ३,८०,००,००० | ०० | ९ ब. संशयित व बुडीत (गुंतवणूक निधी) | ४,३८,३०,००० | ०० | | |
| ४,५०,००,००० | ०० | १०. गुंतवणूक चढउतार निधी | ४,९०,००,००० | ०० | | |
| २९,८३,२५० | २३ | ११. इमारत पुन:मुल्यांकन निधी | २६,८४,९२५ | २३ | | |
| २२,५०,००० | ०० | १२. पी.ए.कर्ज निधी | २५,००,००० | ०० | | |
| ६,०९,८२० | ४४ | १३. वैद्यकीय व शैक्षणिक मदत निधी | ५,९९,८२० | ४४ | | |
| ७,९५,०९६ | ०० | १४. सहकार शिक्षण व प्रशिक्षण निधी | ७,९५,०९६ | ०० | | |
| ५०,००,००० | ०० | १५. समारंभ निधी | ५०,००,००० | ०० | | |
| २,५५,९०९ | ७६ | १६. जनरल निधी | २,५५,९०९ | ७६ | | |
